दि.२२.११.२०२३
जा.क्र.एन/११२९ /२०२३

**—: जाहिर नोटीस :—**

जिल्हा न्यायालय सोलापूर व त्याअंतर्गत स्थानिक न्यायालये, तालुका न्यायालये व कार्यालये या ठिकाणी कीटकनाशक व वाळवी प्रतिबंधक औषध फवारणी तसेच आवश्यक तेथे वाळवी प्रतिबंधात्मक (इंजेक्शन) उपाय योजना करणेसाठी जाहिर नोटीसीदवारे दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

**नियम व अटी**

१. सदर जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून दि.०२.१२.२०२३ रोजी सायंकाळी ०५.३० वा. पर्यंत जिल्हा न्यायालय, सोलापूर येथे मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, सोलापूर यांच्या नावाने बंद लखोटयात दरपत्रक सादर करावे.
   लखोटयावर **'कीटकनाशक व वाळवी प्रतिबंधक औषध फवारणी तसेच वाळवी प्रतिबंधात्मक (इंजेक्शन) उपाययोजना करणेकामी दरपत्रक'** असे नमूद करण्यात यावे. तसेच सदरच्या दरपत्रकात नमूद केलेला दर हा मंजुरी तारखेपासून पुढील एका वर्षासाठी कायम राहील याची नोंद घ्यावी.

२. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

३. **दरपत्रकामध्ये कीटकनाशक व वाळवी प्रतिबंधक फवारणी व वाळवी प्रतिबंधक उपाययोजना (इंजेक्शन) (प्रती चौ.मी.) याचे दर नमूद करण्यात यावे.**

४. तालुका स्तरावरील न्यायालये व कार्यालये येथे जाऊन फवारणी करणे बंधनकारक राहील व त्यासाठी होणारा प्रवास खर्च संबंधीत कंपनीस/विक्रेत्यास करावा लागेल.

५. दरपत्रके ही कार्यालयीन वेळेत सकाळी १०.३० ते सायंकाळी ०५.३० पर्यंत सुटीचे दिवस सोडून बंद लखोटयात आणून दयावीत.

६. सदरची दरपत्रके मंजूर करण्याचा अगर कोणतेही कारण न देता नाकारण्याचा तसेच नियम व अटीत बदल करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश साहेब, सोलापूर यांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे.

आदेशावरून,

DISTRICT COURT OF SHOLAPUR
सत्यमेव जयते
डिस्ट्रिक्ट कोर्ट सोलापूर

अधिक्षक

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, सोलापूर